"जल शक्ती अभियान: कॅच द रेन" तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण बृहद आराखड्याच्या (Artificial recharge to Ground Water) अंमलबजावणी करीता राज्य व जिल्हा स्तरीय समिती गठीत करणे बाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.६०/जल-१**
मंत्रालय, मुंबई -४०००३२
तारीख: २० मे, २०२६

वाचा:

१. जल संसाधन विभाग, नदी विकास आणि गंगा पुर्नजीवन विभाग, जलशक्ती मंत्रालय, नवी दिल्ली यांचे ज्ञापन क्रमांक M-९६०११/२०२२-NWR/MOWR दि.२२.०३.२०२२
२. मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय- संकिर्ण २०२१/प्र. क्र. १६९/जल-१, दि. २६.०४.२०२२
३. डॉ. नंदकुमारन पी. अध्यक्ष, केंद्रीय भुमीजल बोर्ड यांचे दि. २९ नोव्हेंबर २०२१ चे अर्धशासकीय पत्र.
४. मृद व जलसंधारण विभाग शासन निर्णय- संकिर्ण २०२३/प्र. क्र. २७२/जल-१, दि. ०७.०७.२०२३
५. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०३ व ०४ एप्रिल, २०२५ रोजी पुणे येथे संपन्न महसूल परिषदेमध्ये दिलेले निर्देश

प्रस्तावना

अ) संदर्भ १ च्या पत्रान्वये प्राप्त सूचने नुसार “जलशक्ती अभियान- कॅच द रेन” ही एक कालबद्ध मोहीम असुन हा भारत सरकारच्या विविध मंत्रालयांचा आणि राज्य सरकारांचा एकत्रित उपक्रम आहे.

“जलशक्ती अभियान” हे प्रामुख्याने खालील पाच उपक्रमांवर आधारीत आहे:-
१) जलसंधारण आणि पावसाचे पाणी साठवण,
२) पारंपारिक आणि इतर जलस्त्रोत तसेच मुख्य जलसाठ्यांचे नूतनीकरण,
३) जल संरचनेचा पुनर्वापर आणि पुनर्भरण,
४) पाणलोट क्षेत्र विकास करणे
५) सघन वनीकरण.

जलशक्ती अभियानाअंतर्गत पावसापासुन उपलब्ध पाण्याच्या प्रत्येक थेंबांचे जतन करणे हे प्रमुख उद्दीष्ट असुन या अभियाना अंतर्गत प्रामुख्याने पुढील बाबींवर भर देणे अपेक्षित आहे.

१) जलसंधारण व पावसापासुन उपलब्ध होणा-या पाण्याची साठवणुक: यामध्ये छतावर पडणा-या पावसाचे पाणी साठविण्यासाठी इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टींगची बांधकामे करणे, इमारतीच्या आवारामध्ये पावसाचे पाणी मुरविण्यासाठी शोषखड्डे घेणे, अस्तित्वातील जलसंधारणाची बांधकामे सुव्यवस्थित ठेवणे व त्यांची नियमीत देखभाल करणे, नवीन साठवण बंधारे, तलाव बांधणे, पावसाचे

पाणी साठवावयाच्या पारंपारिक साठ्यांचे पुनरुज्जीवन करणे, जलसाठे व जलसंधारणाची कामे यांचेतील तसेच त्यांच्या पाणलोट क्षेत्रातील अतिक्रमणे दुर करणे, तलावातील गाळ काढणे, विंधन विहिरींचे पुर्नभरण व पुर्नवापर करणे, पाणलोट क्षेत्र विकास, छोट्या नद्या, नाले, ओहोळ, ओढे यांचे पुनरुज्जीवन करणे, पाणथळ जमिनींचे संरक्षण करणे, पाण्याच्या उद्भवांचा/ पाझरांचा विकास करणे या बाबींचा समावेश करण्यात यावा.

२) सर्व जलसाठ्यांची (Water bodies) गणना करणे व अशा साठ्यांचे Geo-tagging करणे व त्या आधारीत जलसंवर्धनासाठी शास्त्रीय आराखडे बनविणे.

३) सर्व जिल्ह्यांमध्ये जलशक्ती केंद्रांची स्थापना करणेः- जलशक्ती केंद्र हे जलसंवर्धानाबाबत माहितीचा प्रचार/ प्रसार करणे, पाण्याच्या बचतीची व संवंर्धनाची कौशल्ये यांची माहिती देणे यासाठी 'ज्ञान केंद्र' म्हणुन कार्य करेल. जिल्हा प्रशासन व स्थानिक जलसंर्वधनाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे ही जल शक्ती केंद्राची प्रमुख जबाबदारी राहील.

४) सघन वनीकरणावर भर देणे.

५) जन सामान्यांपर्यंत जलशक्ती अभियानाची माहिती पोहचवून जलसंवर्धनाबाबत, पाण्याच्या पर्याप्त वापराबाबत प्रबोधन घडवुन आणणे.

या सोबतच मृदा ओलावा संवर्धन लोकसहभागातून जलआंदोलन हे जनआंदोलन होण्यास प्रोत्साहन देणे देखिल या मोहीमेत अभिप्रेत आहे."जल आंदोलन हे जनआंदोलन" व्हावे हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी लोकसहभागाची नितांत आवश्यकता आहे आणि त्यासाठी या सर्व उपक्रमांचा समन्वय साधण्याकरिता जिल्हा स्तरावर व मोठ्या महापालिकेच्या स्तरावर एक समन्वय समिती स्थापन करणे गरजेचे असल्याने शासनाने "जल शक्ती अभियान: कॅच द रेन" च्या अंमलबजावणीबाबत संदर्भ २ प्रमाणे निर्णय निर्गमीत करून जिल्हा व महानगरपालिका स्तरीय समिती स्थापण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत आहे.

**आ)** संदर्भ क्र. ३ अन्वये केंद्रीय भूमीजल बोर्ड, भारत सरकार यांनी Master Plan for Artificial Recharge to Ground Water ची बृहत योजना निर्गमित केली आहे. विविध भौगोलिक परिस्थितीनुसार राज्यातील जलधर पुनर्भरण (Aquifer Recharge) होणे करिता दीर्घकालीन भुजल नियोजन करून विविध कृत्रिम भुजल पुनर्भरण बांधकामांची योग्यता तपासून पाहण्याकरिता आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर कृत्रिम भुजल पुनर्भरण बांधकामे हाती घेताना विविध प्रशासकीय विभागांचा सहभाग गरजेचा आहे, त्या करीता राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समिती स्थापन करणेबाबत केंद्रीय भूमीजल बोर्ड, भारत सरकार यांनी सुचित केले आहे.

सदर उपक्रम हे व्दिस्तरीय पध्दतीने राबविणे नियोजित असून निर्गमित मार्गदर्शक सुचनांनुसार सद्यस्थितीतील पुर्ण झालेली बांधकामे, वाहून जाणारे अतिरिक्त पावसाच्या पाण्याची उपलब्धता आणि राष्ट्रीय जलभृत मानचित्रण आणि प्रबंधन कार्यक्रम (NAQUIM) यांचेमार्फत तयार केलेला बृहत आराखडा यांवर आधारित गावनिहाय पुर्वव्यवहार्यता अहवाल तयार करणेकरिता राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याचे निर्देश आहेत. त्यानुषंगाने शासनाने संदर्भ ४ चा शासन निर्णय निर्गमीत केला आहे.

**इ)** राज्य शासनाच्या धोरणात्मक योजनांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व प्रतिक्रीया समाविष्ट करुन कार्यक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी विभागीय

आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने काही शिफारशीसह अहवाल सादर केला आहे.

विविध विभागामार्फत गठित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समित्यांचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी असल्याने आणि तालुकास्तरीय समितीमध्ये महसूल विभागातील अधिकारी यांचा समावेश असल्याने त्यांचा बराचसा कार्यालयीन वेळ बैठकांकरिता खर्च होत आहे. सबब,या अहवालामध्ये विविध विभागांच्या जिल्हास्तरीय समिती, उपविभागीय समिती आणि तालुकास्तरीय समिती यांबाबत समिती कायम ठेवणे, समिती रद्द करणे आणि समितीची पुर्नरचना करणे यांसारख्या शिफारशींचा समावेश आहे. त्यानुसार संदर्भ ५ नुसार कृत्रिम भुजल पुनर्भरण बृहद आराखडा अंमलबजावणी बाबत च्या शासन निर्णय मधील समितीची पुर्नरचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या नुसार वरील दोन्ही संदर्भ २ व ४ शासन निर्णय अधिक्रमीत करुन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:**

**अ. 'जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण राज्य स्तरीय' समिती :**

जलशक्ती अभियान, जल संचय जन भागीदारी तसेच कृत्रिम भुजल पुनर्भरण इ. च्या अंतर्गत होणारी कामे हे विविध विभागामार्फ़त अभिसरणाच्या माध्यमातून राबविली जातात मात्र राज्य स्तरावरून त्या बाबत संबंधीत विभागामार्फ़त नियंत्रण नसल्याने प्रक्षेत्रावरील अधिकारी /कर्मचा-यां मार्फ़त सदरची कामे पोर्टल वर उपलोड करण्याबाबत उदासिनता दिसून येते,त्यामुळे राज्याची झालेली कामे देश पातळीवर दिसून येत नाहीत. त्यामुळे जलसंधारणाची कामे वेळेत पुर्ण व्हावीत, ती देश पटलावर दिसून यावीत,राज्य स्तरावर नियोजन व्हावे इ. बाबीं करीता योग्य कार्यवाहीच्या अनुषंगाने शासनाने पुढील प्रमाणे जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण राज्य स्तरीय समीती प्रस्तावीत केली आहे.

**१. राज्यस्तरीय समितीची रचना**

| | | |
|---|---|---|
| १ | सचिव मृद व जलसंधारण | **अध्यक्ष** |
| २ | सह /उप/अवर सचिव नगर विकास विभाग | सदस्य |
| ३ | सह /उप/अवर सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |
| ४ | सह /उप/अवर सचिव कृषी विभाग | सदस्य |
| ५ | सह /उप/अवर सचिव जलसंपदा विभाग | सदस्य |
| ६ | सह/उप/अवर सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | सदस्य |
| ७ | सह/उप/अवर सचिव ग्राम विकास तथा पंचायत राज विभाग | सदस्य |
| ८ | सह /उप/अवर सचिव महसूल व वन विभाग | सदस्य |
| ९ | सह /उप/अवर सचिव रो.ह.यो | सदस्य |
| १० | विभागीय निर्देशक, केंद्रिय भुमीजल बोर्ड,नागपूर,भारत सरकार | सदस्य |
| ११ | आयुक्त भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा | सदस्य |
| १२ | आयुक्त मृद व जलसंधारण विभाग | सदस्य सहसचिव |

**राज्यस्तरीय समितीची कार्यकक्षा**

- जलशक्ती अभियान, जल संचय जन भागीदारी,अमृत सरोवर तसेच कृत्रिम भुजल पुनर्भरण इ. उपक्रमांसाठी राज्यस्तरीय एकात्मिक धोरण तयार करणे.
- नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, कृषी, जलसंपदा, पाणी पुरवठा, ग्राम विकास, महसूल, वन व रोहयो या सर्व विभागांमध्ये अभिसरण (Convergence) सुनिश्चित करणे.
- जिल्हास्तरीय समित्यांनी केलेल्या कामांचा राज्यस्तरावर आढावा घेणे.
- जलशक्ती अभियान व जल संचय-जन भागीदारी पोर्टलवर कामांची नोंद वेळेत होत आहे याची खातरजमा करणे - जेणेकरून महाराष्ट्राची कामगिरी राष्ट्रीय पातळीवर दिसून येईल.
- राज्यातील सर्व विभागांमार्फत कालबद्ध पद्धतीने जलसंधारणाची कामे पूर्ण होतील यासाठी नियंत्रण ठेवणे.
- अ, ब व क वर्ग महापालिकांनी गठित केलेल्या जलशक्ती अभियान समित्यांची माहिती व त्यांच्या कामकाजावर राज्यस्तरीय देखरेख ठेवणे.
- जिल्हे व जलशक्ती केंद्रांची कामगिरीनुसार क्रमवारी (Ranking) निश्चित करणे.
- राज्याच्या एकूण प्रगतीचा अहवाल केंद्र सरकारला (जलशक्ती मंत्रालय) सादर करणे.

**ब.** 'अ' 'ब' व 'क' वर्ग महापालिकांच्या बाबतीत संबंधित महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली महापालिका कार्यक्षेत्रापुरती 'जलशक्ती अभियान समिती' स्थापन करण्यात यावी. या समितीचे सदस्य कोण असावेत याबाबतचा निर्णय संबंधित महापालिका आयुक्त यांनी घ्यावा तथा अंतिम झालेल्या समीतीची माहिती "जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण राज्य स्तरीय समितीस" सादर करावी.

**क. 'जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण जिल्हा स्तरीय समिती':**

जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण जिल्हा समिती ही जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात यावी. या समितीची रचना व कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे. या समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये जिल्ह्यातील 'ड' वर्ग महापालिका येतील.

**जिल्हास्तर समितीची रचना:**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) | सह अध्यक्ष |
| ३ | आयुक्त महानगर पालिका 'ड' वर्ग मनपा (असल्यास) / मुख्य अधिकारी नगरपरिषद / नगरपंचायत | सदस्य |
| ४ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कृषी विभाग | सदस्य |
| ५ | उपविभागीय वन संरक्षक, वन विभाग | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग (जि.प.) | सदस्य |
| ७ | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| ८ | सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | सदस्य |
| ९ | सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १० | उपजिल्हाधिकारी, रो.ह.यो. | सदस्य |
| ११ | शिक्षण अधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| १२ | शिक्षण अधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| १३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| १४ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (बालकल्याण) जि.प. | सदस्य |
| १५ | वरिष्ट भुवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| १७ | जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृ. व जसं. विभाग | सदस्य सचिव |

स्थानिक गरजेनुसार 'जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण जिल्हा' समितीमध्ये उपरोक्त सुचीमध्ये नमुद अधिका-यांशिवाय अन्य जिल्हास्तरीय अधिका-याचा समावेश करता येईल.

**जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा:**

१. जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरणची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.
२. जलशक्ती केंद्राची स्थापना करणे व त्यांचे कामकाज सक्षमतेने पार पाडले जाईल याची दक्षता घेणे.
३. प्रत्येक जिल्हास्तरीय विभागामार्फ़त प्रत्येक गावपातळीवरील जलशक्ती अभियानाचा आराखडा पंधरा दिवसात तयार होईल हे सुनिश्चित करणे.
४. प्रत्येक जिल्हास्तरीय विभागामार्फ़त कामाचे कालबद्ध नियोजन करणे व त्याला जिल्हा एकत्रित आराखड्यामध्ये समाविष्ट करणे.
५. जिल्हा एकत्रित आराखड्याचे नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करणे.
६. सार्वजनिक (कोणत्याही योजनेंतर्गत तयार केलेल्या) आणि वैयक्तिक जलसाठ्यांचे (Geo-tagging) करणे, त्यांची अधिकार अभिलेखांमध्ये नोंदणी करणे.
७. जल शक्ती केंद्र: जलशक्ती केंद्र समन्वय आणि माहिती, शिक्षण व प्रसार (IEC) चे एक महत्त्वाचे स्त्रोत बनणार आहे. त्या दृष्टीने जलशक्ती केंद्राचे बळकटीकरण करणे.
८. प्रस्तावित कामांची पुर्वव्यवहार्यता अहवाल तयार करणे व सदर कामे निधी उपलब्धतेच्या अधीन राहून कामे पुर्ण करणेचे नियोजन करणे.
९. निधी उपलब्धतेच्या अधीन राहून कृत्रिम जलधर पुनर्भरण कार्यक्रमाअंतर्गत करावयाच्या कामांना मान्यता देणे व कामे पुर्ण करणे.
१०. केंद्रिय जलभुमी बोर्ड, भारत सरकार यांचेशी सल्लामसलत करून दर पाच वर्षानंतर सुक्ष्म पातळीवर पुर्नभरण योजना आखणे.
११. दर महिन्याला बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेणे.
१२. सर्व सरकारी इमारती, सर्व शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाडी इ. परिसरात वृक्षारोपण करणे व रूफ टॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर्स असतील याची दक्षता घेणे.

**ड. “जलशक्ती अभियान-कॅच द रेन” च्या प्रगतीचे संनियंत्रण आणि अहवाल**

- विभागीय आयुक्त त्यांच्या विभागातील जिल्ह्यांच्या उपक्रमांचे पर्यवेक्षण करतील. जलशक्ती अभियान तथा कृत्रिम भुजल पुनर्भरण अभियानातील कामगिरी हा जिल्हाधिकारी यांचा KRA असेल.
- संबंधित जिल्हे आणि जलशक्ती केंद्रांची त्यांच्या प्रत्येक कामगिरीच्या आधारावर क्रमवारी लावली जाईल.
- झालेल्या कामांची नोंद जलशक्ती अभियान तथा जल संचय-जन भागिदारी च्या पोर्टलवर करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०५२०१६३६३३१७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAKASH NILKANTHRAO PATIL

Digitally signed by PRAKASH NILKANTHRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SWCD, 2.5.4.20=A7DC90F966C671A9ACD0A599EE5FC497272E775D33643B14725C6A77432C673F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1EC28A96B2A52575AE4CCCA512D1723F249D503AE71CF458BA4863AACFFBF62, cn=PRAKASH NILKANTHRAO PATIL
Date: 2026.05.20 16:37:23 +05'30'

**(प्र. नि. पाटील)**
**कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, अपर मुख्य सचिव.
३. विरोधी पक्षनेते, विधान परिषद/विधानसभा, विधान सचिवालय, विधान भवन, मुंबई.
४. सर्व माननीय संसद सदस्य, विधिमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५. सर्व. मंत्री/राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
६. मुख्य सचिवांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र राज्य.
७. अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सर्व मंत्रालयांचे सचिव.
८. मा.सचिव (मृद व जलसंधारण)
९. माननीय राज्यमंत्री
१०.सचिव यांचे स्वीय सहाय्यक (मृद व जलसंधारण)
११.महालेखापाल-१ (लेखा व परवाना) (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२.आयुक्त मृद व जलसंधारण, औरंगाबाद.
१३.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१६.अतिरिक्त आयुक्त व मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, प्रादेशिक क्षेत्र, सर्व.

१७.प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सर्व.
१८.प्रादेशिक दक्षता गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सर्व.
१९.जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सर्व.
२०.जिल्हा जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) जिल्हा परिषद, सर्व.
**२१.**निवड नस्ती (जल-१)